# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**अन्न सुरक्षा अधिकारी, (Food Safety Officer), अन्न व औषध प्रशासन, गट-ब**

**धारिका क्रमांक :१०११/७७५/X** **जाहिरात क्रमांक : १२७/२०१५**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवरील **अन्न व सुरक्षा अधिकारी, (Food Safety Officer) अन्न व औषध प्रशासन, गट-ब च्या ४८** पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| जात प्रवर्ग | अजा | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एकूण मागासवर्गीय | अमागास | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | -- | २ | १+१* | -- | २+१* | -- | -- | २ | ९ | २५+१२* +२☑ | ४८ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | २ | १ | -- | २ | -- | -- | २ | ७ | २५ | ३२ |
| महिला | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | -- | २ | १२ | १४ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| अपंग | एकूण पदसंख्येपैकी ५ पदे अपंगांसाठी आरक्षित, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or Cerebral Palsy) ३ पदे, श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impairment)- २ पदे | | | | | | | | | | |

**(* उपलब्ध असल्यास महिलांसाठी राखीव ☑ उपलब्ध असल्यास अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी आरक्षित,@ एकूण पदसंख्येपैकी ५ पदे अपंगांसाठी आरक्षित, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or Cerebral Palsy) ३ पदे, श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impairment)- २ पदे )**

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ विचाराधीन पदाकरिता अपगांसाठी पद आरक्षित असले तरी शासन निर्णय क्र. एफडीएस १२१५ / प्र.क्र.२९/१५/औषधे१ दि. २०/०२/२०१५च्या अनुषंगाने १)श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impairment) २) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or Cerebral Palsy) असे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करु शकतात

**२.३ वि.जा.(अ), भ.ज.(क) साठी आरक्षित पदे आंतरपरिवर्तनिय असून वि.जा.(अ), भ.ज.(क) चे योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन आदेशानुसार सदर पदे भ.ज.(ब) किंवा भ.ज.(ड) मधून आंतरपरिवर्तनियतेने गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.**

**३. वेतनश्रेणी : रु.९३००-३४८००/- ग्रेड पे-४४००/- .**

**४. पात्रता- उमेदवार भारतीय नागरिक असावा.**

४.१ वय- **दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी अमागास वर्गवारीकरिता ३३ व मागासवर्गवारीकरिता ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे.**

४.२ शासन आदेशानुसार संबंधित आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

४.३ शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. (**मुलाखतीसाठी पाचारण केल्या गेलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडू असल्याची प्रमाणपत्रे क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत**).

४.४ **शैक्षणिक अर्हता:- १. Qualification**

**(i) A degree in Food Technology or Dairy Technology or Biotechnology or Oil Technology or Agricultural Science or Veterinary Sciences or Bio-Chemistry or Microbiology or Masters Degree inChemistry or degree in Medicine from a recongnized University OR**

**(ii) Any other equivalent/recongnized qualification notified by the Central Government, AND**

**(iii) has sucessfully completed training as specified by the Food Authority in a recongnized institute or Institution approved for the purpose.**

**Provided that no person who has any financial interest in the manufacture, import or sale of any article of food shall be appointed to be a Food Saftety Officer as per Food Safety and Standard Rules, 2011.**

2. **On the date of commencement of these Rules, a person who has already been appointed as a Food Inspector under the provisions of Prevention of Food Adulteration Act, 1954, may perform the duties of the Food Safety Officer if notified by the state, Central Government if the officer fulfils such other condition as may be prescribed for the post of Food Safety Officer by the State Government.**
3. **State Government may, in cases where a Medical Officer of Health Administration of local area has been performing the function of Food Inspector under the prevention of Food Adulteration Act, 1954, assign the powers and duties of Food Safety officer such Medical Officer incharge of Health administration of that area.**
   **Provided further that the persons appointed under clause 2 and 3 above, shall undergo a specialized training laid down by the Food Authority with in a period of two years from the commencement of these rules.**

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने कार्यनियमावलीच्या अट ९(v),(vi),(vii) व (viii) मध्ये नमूद असल्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**६. कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७. शुल्क** : **१)अमागास - रु.३६५/- २)मागासवर्गीय - रु. २६५ /-**

**८. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**९. अर्ज करण्याची पध्दत –**

**९.१ ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व पात्रतेच्या निकषांमध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे. अशा उमेदवारांची सर्वसाधारण (अमागास) वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.**

**९.२** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**९.३** पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ ते दिनांक २६ ऑगस्ट, २०१५** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**९.४** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.५** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**९.६** आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**९.७** https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**९.८** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' Unpaid ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१०.** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१३.** खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक संचालनालयाकडून अर्ज करण्यापूर्वीच प्रमाणित करुन घेण्यात यावीत.

१४. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१५. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१६. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ६ ऑगस्ट, २०१५

श्री. शं. पाठक
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.